


# भारत व्हिजन
## २०४७

संपादक

प्रा. (डॉ). अनिल पाटील

भारत व्हिजन २०४७

(Bharat Vision : 2047)

संपादक : प्रा.(डॉ.)अनिल पाटील

© प्रकाशक व संपादकाधीन

आवृत्ती : प्रथम आवृत्ती. २२ सप्टेंबर २०२४

(कर्मवीर भाऊराव पाटील जयंती)

ISBN Number : 978-93-94710-89-4

प्रकाशक: रूपाली चिघळीकर

रूपी पब्लिकेशन्स प्रा. लि.

'समता' 385/42 मोर्डी कॉलनी, काळभैरी रोड,

गडहिंग्लज जि. कोल्हापूर

Email: rupipublications@gmail.com

मोबाईल: 9822651377

मुद्रक : भारती डिजिटल प्रिंटींग प्रेस.

शाहूपुरी, कोल्हापूर.

अक्षरजुळणी : ज्ञानज्योत प्रोडक्शन, कोल्हापूर

मूल्य : रु ३९९/-

सदर पुस्तकातील कोणत्याही भागाचे पुनर्निर्माण अथवा वापर इलेक्ट्रॉनिक अथवा यांत्रिकी साधनाने फोटोकॉपिंग, रेकॉर्डिंग किंवा कोणत्याही प्रकारे माहिती साठवणुकीच्या तंत्रज्ञानातून प्रकाशकांच्या परवानगी शिवाय करता येणार नाही. सर्व हक्क राखून ठेवले आहेत. या पुस्तकातील सर्व मतमतांतरे लेखकांचे आहेत. त्यास प्रकाशक व संपादक जबाबदार राहणार नाहीत.

# विकसीत भारतासाठी पाणी बचत

डॉ. ज्ञानराजा चिघळीकर

भारत सरकारने विकसीत भारत २०४७ हे अभियान सुरु केले आहे. १५ ऑगस्ट् २०४७ रोजी भारतीय स्वातंत्र्याला झाला शंभर वर्षे पूर्ण होतात. म्हणूनच भारताला विकसीत राष्ट्र बनवण्याचे आपले उद्दिष्ट आहे. विकसीत राष्ट्राच्या व्याख्यामध्ये सकल देशांतर्गत उत्पन्न, सकल राष्ट्रीय उत्पन्न आणि दरडोई उत्पन्न जास्त असणे गरजेचे आहे. तसेच देशातील लोकांचे उच्च दर्जाचे राहणीमान अपेक्षित आहे. राष्ट्राला विकसीत करण्यासाठी जशी रस्ते, रेल्वे, वीज, वाहतूक दळणवळणाची गरज आहे, त्यापेक्षाही जास्त पाण्याची गरज आहे. पाण्याशिवाय कोणत्याही राष्ट्राचा विकास अशक्य आहे.

इस्त्राराईल सारख्या कमी पावसाच्या देशाने केवळ पाणी बचतीच्या बळावर शेतीचा विकास घडवून आणला आहे. पाणी वाया न घालवता त्याचा काळजीपूर्वक वापर करण्यालाच पाणी बचत हे नाव देण्यात आलेले आहे. पाणी बचत तसेच जलसंवर्धन करण्यासाठी शासकीय पातळीवर विविध योजनांच्या माध्यमातून प्रयत्न सुरु आहेत. देशातील नागरिकांनी सुद्धा पाणी बचतीची व्यापक स्वरुपात चळवळ सुरु करण्याची गरज निर्माण झालेली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने व युनिसेफच्या सहकार्याने महाविद्यालयीन युवकांच्या सहभागाने ‘नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण, संवर्धन व पाणी बचत अभियान’ सुरु करण्यात आले आहे. सदर लेखाच्या माध्यमातून पाणी बचत अभियान, पाणी बचत व जलसंवर्धनासंदर्भात छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतीराव फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या महापुरुषांची भूमिका,